सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १३० | शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन





श्री. मुरलीधर बिऱ्हाडे
व्यापारी



श्री. पंकज शेटे
पत्रकार

# केंद्रीय कृषीमंत्री ना. शिवराजसिंह चौहान १९ मार्चला अमळनेरात

## राष्ट्रीय स्तराच्या कृषी चळवळीचा श्री मंगळग्रह मंदिरातून भूषणावह प्रारंभ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : देशात शेतीच्या जमिनीतील कार्बन पातळी सतत घटत असून सुपीकता कमी होत चालली आहे. पृथ्वीचे संरक्षण करण्यासाठी देशातील प्रमुख संस्थांनी २०२१ मध्ये सामाजिक स्तरावर भूमी सुपोषण व संरक्षणासाठी राष्ट्रीय स्तरावर जनजागरण अभियान सुरू केले. या अभियानामध्ये कृषी व पर्यावरण क्षेत्रात कार्यरत सामाजिक व धार्मिक संस्थांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे भारतातील हजारो गावांमध्ये भूमिपूजन कार्यक्रमांच्या माध्यमातून भूमी सुपोषण व संरक्षण कार्याला चालना मिळाली. यामुळे मोठ्या प्रमाणावर शेतकरी आता भूमीबाबत जागरूक होत आहेत. रासायनिकमुक्त शेतीकडे वळत आहेत. त्याचाच भाग म्हणून अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षी चैत्र शुद्ध



प्रतिपदा अर्थात १९ मार्च २०२६ म्हणजेच गुढीपाडव्यास या राष्ट्रीय स्तरावरील चळवळीचा अमळनेरमधून प्रारंभ होणार आहे. विशेष म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदा हा भूमी मातेचा जन्मदिवस असतो. त्यामुळे या दिवसाचे औचित्य साधून या उपक्रमाचा शुभारंभ होत आहे. त्यासाठी केंद्रीय कृषीमंत्री ना. शिवराजसिंह चौहान यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, धार्मिक, सामाजिक व कृषी क्षेत्रातील अनेक महनीय व्यक्ती मार्गदर्शनासाठी येणार आहेत. १९ मार्च रोजी संपूर्ण भारतात समाजाच्या सहभागातून हे




अभियान राबविले जाणार आहे.

कृषी व पर्यावरण क्षेत्रातील शास्त्रज्ञांनी अनेकदा चिंता व्यक्त केली, की शेतीच्या जमिनीचा भौतिक, रासायनिक व जैविक समतोल बिघडत चालला आहे. तसेच जमिनीत वाढत चाललेल्या प्रदूषणामुळे येत्या काही वर्षांत उत्पादनावर विपरीत परिणाम संकटाच्या स्वरूपात समोर येऊ शकतो. भूमीतील जैविक कार्बन आवश्यकतेपेक्षा खूपच कमी झाला आहे. त्यामुळे देशहित व शेतकरी हित लक्षात घेऊन सामाजिक संस्थांनी भूमी सुपोषणाच्या माध्यमातून सकारात्मक बदलाचे बीज रोवले आहे. मागील ५ वर्षांत देशातील ३० हजार गावांमध्ये व ५४ हजार शहरी ठिकाणी भूमिपूजन व प्रबोधनात्मक कार्यक्रम घेण्यात आले आहेत.

देशातील अनेक सामाजिक व धार्मिक संस्था, हजारो गोशाळा, स्वयंसेवी संस्था तसेच देशातील सर्व कृषी विद्यापीठे व कृषी विज्ञान केंद्रांशी संपर्क साधून या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अभियानांतर्गत भूमिपूजन, भूमी सुपोषण करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान, भूमी सुपोषण प्रयोगांचे प्रशिक्षण, संगोष्ठी, कार्यशाळा, जनजागृती शिबिरे, प्रदर्शने इत्यादींचेही ठिकठिकाणी आयोजन करण्यात येणार आहे. नागरी भागांमध्ये जैविक व अजैविक कचऱ्याचे विभाजन, जैविक कचऱ्यापासून खतनिर्मिती यांसारख्या उपक्रमांसाठी जनजागृती कार्यक्रमही राबविण्यात येतील. भूमी सुपोषणाशी संबंधित विविध साहित्य www.bhumisuposhan.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.



> श्री मंगळग्रह मंदिरात दाक्षिणात्य शैलीतील विश्वातील एकमेव श्री भूमी मातेची मूर्ती आहे. मातेच्या जन्मदिवसाच्या सुमुहूर्तावर श्री मंगळग्रह मंदिरातून 'भूमी सुपोषण' या राष्ट्रीय स्तरावरील जनजागरण अभियानाचा प्रारंभ होणार आहे. हे आम्ही आमचे सौभाग्य समजतो. या अभियानाच्या निमित्ताने हजारो शेतकरी देशभरातून अमळनेरला येतील. येताना आपल्या शेतातील एक मूठ माती सोबत आणतील. या एकत्रित केलेल्या मातीचे पूजन होईल आणि ही पूजा झालेली माती गावोगावी वाटप केली जाईल. या कार्यक्रमासाठी अनेक महनीय व्यक्ती मार्गदर्शनासाठी येणार आहेत. भूमी सुपोषण करून देश सुजलाम्-सुफलाम् करण्याची ही जी अभियानाची सुरूवात होत आहे, ही आपल्या जिल्ह्यासाठी व खानदेशवासीयांसाठीही अत्यंत आनंदाची व अभिमानास्पद बाब आहे. या अभियानाच्या यशस्वितेसाठी आम्ही लवकरच तज्ज्ञ मान्यवरांच्या नियोजनात्मक बैठकी घेणार आहोत.
>
> **– डॉ. डिगंबर महाले,**
> **अध्यक्ष-मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर.**

अमळनेरधील कार्यक्रमास केंद्रीय कृषिमंत्री ना. चौहान यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य तथा सहकार्यवाह भागैय्याजी, कनेरी मठाचे गादीपती परमपूज्य काडसिद्धेश्वर स्वामीजी यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. या अभियान संचालनात राष्ट्रीय संयोजक पद्मश्री कृषक सुभाषजी शर्मा, संयोजक श्री. नवलजी रघुवंशी (इंदूर), सहसंयोजक श्री. आलोकजी गुप्ता (दिल्ली) यांची प्रमुख उपस्थिती व सहकार्य लाभणार आहे.

## दिनविशेष

३१ जानेवारी

- स्वातंत्र्यवीर सावरकर यांना दुसऱ्यांदा जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. ब्रिटिश साम्राज्यात दोनदा जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आलेले ते एकमेव व्यक्ती आहेत.
- बडोदा आणि कोल्हापूर (तत्कालीन) मुंबई राज्यात विलीन झाले.
- डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी राष्ट्रपती म्हणून संसदेतील पहिले भाषण दिले.
- राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना
- 'मेजर सोमनाथ शर्मा' परमवीर चक्राचे पहिले मानकरी यांचा जन्म.
- 'गंगाधर महांबरे' गीतकार कवी व लेखक यांचा जन्म.
- 'प्रीती झिंटा' चित्रपट अभिनेत्री यांचा जन्म.
- 'दत्तात्रय रामचंद्र बेन्द्रे' कन्नड कवी यांचा जन्म.
- 'विश्वनाथ मोरे' संगीतकार यांचे निधन
- 'वसंत जोगळेकर' मराठी व हिंदी चित्रपट निर्माते व दिग्दर्शक यांचे निधन
- 'वसंत कानेटकर' नाटककार यांचे निधन

# स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजलीसाठी अमळनेरात रविवारी सर्वपक्षीय शोकसभा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्याचे उपमुख्यमंत्री, एक दमदार नेतृत्व, सर्वांचे लाडके नेते ना. अजितदादा पवार दुर्दैवाने अकाली आपल्याला सोडून गेले. त्यांना सामूहिक आणि सर्वपक्षीय श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात शोकसभा आयोजित केली आहे.



अमळनेर तालुक्यातील सर्व नागरिक, राजकीय पक्ष, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी, व्यापारी, शिक्षक, शासकीय कर्मचारी, आशा वर्कर्स, लाडक्या बहिणी, डॉक्टर्स, लायन्स, रोटरी, महिला मंडळ, निमशासकीय कर्मचारी, महसूल संघटना, वकील संघ, पत्रकार संघटना, धरण संघर्ष समिती, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, प्राध्यापक संघ, मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर तालुका फोटोग्राफर असोसिएशन, स्वामीनारायण संस्था, संतश्री सखाराम महाराज वाडी संस्थान, भाजीपाला विक्रेते, अंगणवाडी सेविका, पोलीस पाटील, ग्रामसेवक, तलाठी, आजी व माजी नगरसेवक, एस. टीय कर्मचारी, टॅक्सी युनियन, सर्व समाज पंचमंडळ तसेच इतर सर्व संस्था यांना आवाहन करण्यात आले आहे, की अजितदादा आणि अमळनेरचा विकास यांचे २५ वर्षांपासून एक अतूट आणि हक्काचे नाते होते. त्यामुळे येथील प्रत्येक व्यक्तीचा दादांबाबत जिव्हाळा होता. अजितदादांच्या ऋणातून अमळनेर कधीच उतराई होऊ शकणार नाही. मात्र सार्वजनिक शोकसभेतून आपल्या भावना आपण अनंतात व्यक्त करू शकतो. तरी सर्वांनी शोकसभेस आवर्जून यावे, असे आवाहन सर्वपक्षीय पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# जिन्यांची सुविधा असताना प्रवाशी ओलांडतात सर्रास रूळ

## अमळनेर रेल्वेस्थानकातील धोकेदायक प्रकार; अपघाताचा धोका उद्‌भवण्याची शक्यता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : रेल्वे प्रशासनातर्फे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी येथील रेल्वेस्थानकावर एका फलाटावरून दुसऱ्या फलाटावर जाण्यासाठी एक नव्हे, तर दोन जिन्यांची (फूटओव्हर ब्रिज) सुविधा उपलब्ध करून दिली आहे. मात्र तरीही अनेक प्रवासी या सुरक्षित उपायांच्या सुविधेकडे दुर्लक्ष करून सर्रास रूळ ओलांडताना दिसत आहेत. त्यामुळे अपघाताचा मोठा धोका उद्‌भवण्याची शक्यता आहे. मात्र रेल्वे प्रशासनाकडून अशा प्रवाशांवर कारवाई केली जात नसल्याचे चित्र आहे.

विशेष म्हणजे या धोकेदायक प्रकारात केवळ तरुणच नव्हे, तर नागरिक, वृद्ध, महिला आणि लहान मुलेही सहभागी होत असल्याचे चित्र दिसून येते. फलाटावर रेल्वेगाडी येण्याची किंवा जाण्याची वेळ असतानाही काही प्रवासी घाई-घाईत रूळ ओलांडताना दिसून येतात. येथील स्थानकावर न थांबणारी मालगाडी किंवा वेगवान मेल, एक्स्प्रेस रेल्वेगाडी अचानक येण्याची शक्यता लक्षात न घेता हा जीवघेणा प्रकार सर्रास सुरू आहे. वास्तविक पाहता रेल्वेरूळ ओलांडणे हा रेल्वेच्या



*अमळनेर : रेल्वे प्रशासनातर्फे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी एक नव्हे, तर दोन जिन्यांची सुविधा असताना जीव धोक्यात घालून सर्रास रूळ ओलांडताना प्रवाशी.*

कायद्यान्वये गुन्हा असून, त्यातून जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यापूर्वीही अशा प्रकारच्या घटनांमुळे अपघात घडल्याचीही उदाहरणे आहेत. तरी देखील प्रवाशांकडून सुरक्षिततेबाबत आवश्यक ती जागरूकता दिसून येत नाही.

यासंदर्भात रेल्वे प्रशासनाने जिन्याची सुविधा, सूचना फलक आणि घोषणांद्वारे सतर्कता आणण्याचा प्रयत्न केला असला, तरी प्रवाशांनी स्वतःची आणि कुटुंबाची सुरक्षितता लक्षात घेऊन नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. एका क्षणाची घाई आयुष्यभराची हानी ठरू शकते, याची जाणीव ठेवून प्रवाशांनी जिन्यांचा वापर प्राधान्याने करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# द्रौ. रा. कन्या शाळेचे क्रीडा स्पर्धेत दुहेरी यश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत मेरा युवा भारत, जळगाव यांच्या वतीने आयोजित क्रीडा स्पर्धा २०२५-२६ नुकत्याच पार पडल्या. यात येथील खो-खो व कबड्डी (मुली) स्पर्धेत द्रौ. रा. कन्या शाळेच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंचा बक्षीस वितरण समारंभ पी.बी.ए. स्कूलच्या हॉलमध्ये नुकताच झाला. चेअरमन योगेश मुंदडा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते विजेत्यांना ट्रॉफी व पदके प्रदान करण्यात आली. द्रौ.



*अमळनेर : युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत मेरा युवा भारत, जळगाव यांच्या वतीने आयोजित क्रीडा स्पर्धेत द्रौ. रा. कन्या शाळेतील खेळाडू विजेते ठरले. त्यानंतर पी.बी.ए. स्कूलच्या हॉलमध्ये झालेल्या ट्रॉफी व पदके प्रदान कार्यक्रमाप्रसंगी खेळाडूंसमवेत आमदार अनिलदादा पाटील, चेअरमन योगेश मुंदडा आदी.*

रा. कन्या शाळेच्या विद्यार्थिनींनी यापूर्वीही विविध स्पर्धांत आपल्या यशाचा ठसा उमटविला आहे. एस. पी. वाघ यांनी सूत्रसंचालन केले. आर. एस. सोनवणे यांनी आभार मानले.

विराट कोहलीचे इन्स्टाग्राम अकाऊंट अचानक बंद पान २...

सोन्या-चांदीच्या भावात 'महाभूकंप' पान ३...

व्यक्तीच्या कर्मानुसार फळ देणारे शनी देव पान ४...

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# हनुमाननगर, शिवाजीनगरात डासांचे उच्छादन; पालिकेतर्फे कीटनाशक, धूर फवारणी सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील हनुमाननगर व शिवाजीनगर परिसरात उघड्या गटारी आहेत. त्यात मोठ्या प्रमाणात घाण साचलेली असून, कचराही पडलेला आहे. यामुळे डास व मोठ्या किड्यांचे प्रचंड उच्छादन वाढले आहे. लहान मुलांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे चित्र आहे.

डास, मच्छर वाढल्याने लहान मुलांमध्ये ताप, सर्दी, अंगदुखी यांसारख्या आजारांचे



प्रमाण वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. परिसरातील उघड्या गटाऱ्या स्वच्छ केल्या जात नसल्याने त्यामध्ये साचलेले पाणी डासांच्या उत्पत्तीस कारणीभूत ठरत आहे. परिणामी डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून, आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

याबाबत नागरिकांनी वारंवार ओरड केल्यानंतर अखेर नगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत गुरुवार, दि. २९ जानेवारी रोजी कीटकनाशक व धूर फवारणी करण्यात आली.

माजी नगरसेवक प्रताप शिंपी यांच्या पुढाकारातून हनुमाननगर व शिवाजीनगर परिसरात नगरपालिकेतर्फे सकाळच्या सत्रात कीटकनाशक व सायंकाळी धूर (फॉगिंग) फवारणी करण्यात आली. त्यामुळे काही प्रमाणात नागरिकांना दिलासा मिळाला आहे. मात्र ही फवारणी तात्पुरत्या स्वरूपात न ठेवता नियमित केली जावी. तसेच गटारींची स्वच्छता करून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. अन्यथा भविष्यात साथीचे विविध आजार पसरण्याचा धोका नाकारता येत नाही.



*अमळनेर : शहरातील हनुमाननगर व शिवाजीनगर परिसरात गुरुवारी करण्यात आलेली कीटकनाशक व धूर फवारणी.*

# मसाला पान




# विराट कोहलीचे इन्स्टाग्राम अकाऊंट अचानक बंद

## २७ कोटी फॉलोअर्स गायब, नक्की काय घडले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार विराट कोहलीचे इन्स्टाग्राम अकाऊंट मंगळवार, दि. २७ जानेवारी २०२६ रोजी अचानक डीॲक्टिव्हेट झाल्याचे दिसून आले. इन्स्टाग्रामवर विराट कोहलीचे नाव सर्च केल्यानंतर प्रोफाईल दिसत नसल्याने चाहत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

विराह कोहलीच्या इन्स्टाग्राम






अकाऊंटला तब्बल २७ कोटी ४० लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत. त्यामुळे इन्स्टाग्राम अकाऊंट अचानक गायब होणे ही बाब अनेकांना धक्का देणारी आहे. सोशल मीडियावर कोहलीचे चाहते स्क्रीनशॉट शेअर करत विविध तर्क-वितर्क लावत आहेत. महत्त्वाचे म्हणजे हे अकाऊंट कोहलीने स्वतः बंद केले आहे की इन्स्टाग्राममधील एखाद्या तांत्रिक अडचणीमुळे ही समस्या निर्माण झाली आहे, याबाबत आतापर्यंत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. विराट कोहली, त्यांची टीम किंवा इन्स्टाग्राम प्रशासनाकडूनही यावर कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.


या प्रकरणात आणखी एक महत्त्वाची बाब समोरा आली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार विराट कोहलीचे भाऊ विकास कोहलीचे इन्स्टाग्राम अकाऊंटही सर्चमध्ये दिसत नाही. त्यांच्या प्रोफाईलवर जाण्याचा प्रयत्न केल्यास 'प्रोफाईल उपलब्ध नाही', असा मेसेज दिसत असल्याचे अनेक युजर्स सांगत आहेत.

खरेतर विराट कोहलीने यापूर्वीही सोशल मीडिया अकाऊंट काही काळासाठी बंद केले होते. त्याने याआधी आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून अनेक जाहिरातींच्या पोस्ट काढून टाकल्या होत्या. क्रिकेट आणि कुटुंबावर अधिक लक्ष केंद्रित करायचे असल्याचे त्याने या अगोदर सांगितले होते. मात्र यावेळी अकाऊंटच गायब झाल्यामुळे चाहत्यांचा गोंधळ वाढला आहे.

# अमिताभ बच्चन यांनी नाकारलेला 'हा' चित्रपट ३ महिने होता हाऊसफुल

## २.५ कोटी बजेट अन् कमाई २५ कोटी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**





बॉलिवूडमध्ये असे काही चित्रपट आहेत, ज्यांना अनेक सुपरस्टार कलाकारांनी नाकारले. मात्र, हेच चित्रपट जेव्हा बॉक्स ऑफिसवर प्रदर्शित झाले, तेव्हा या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. या चित्रपटातील कलाकार सुपरस्टार झाले. अशाच एका बॉलिवूड चित्रपटाबद्दल आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. हा चित्रपट १९८०मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाचे नाव 'कुर्बानी' होते. विशेष म्हणजे हा चित्रपट आधी अमिताभ बच्चन यांना ऑफर करण्यात आला होता. मात्र, बिग बींनी तो नाकारल्याने हा चित्रपट विनोद खन्ना यांना मिळाला. या चित्रपटातून त्यांचे नशिब चमकले होते.

'कुर्बानी' हा ॲक्शन, रोमान्स आणि संगीत यांचा परिपूर्ण संगम असलेला चित्रपट होता. हा चित्रपट दिग्दर्शक फिरोज खान यांनी दिग्दर्शित केला होता. फिरोज खान स्वतः या चित्रपटात मुख्य भूमिकेत झळकले होते. त्यांच्यासोबत विनोद खन्ना आणि झीनत अमान यांनी प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. चित्रपटातील 'आप जैसा कोई', 'लैला ओ लैला' यांसारखी गाणी आजही प्रेक्षकांच्या ओठांवर आहेत. हा चित्रपट जेव्हा प्रदर्शित झाला तेव्हा या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घातला. अवघ्या २.५ कोटी रुपयांच्या बजेटमध्ये तयार झालेल्या या चित्रपटाने तब्बल २५ कोटींपेक्षा जास्त कमाई केली. त्या वर्षातील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरलेल्या 'कुर्बानी'ने सलग तीन महिने थिएटरमध्ये हाऊसफुल्ल शो चालवले.

### अमिताभ बच्चन यांनी का दिला होता नकार?

या चित्रपटामागील आणखी एक रंजक गोष्ट म्हणजे विनोद खन्ना यांनी साकारलेली 'अमर' ही भूमिका सुरुवातीला अमिताभ बच्चन यांना मिळणार होती. फिरोज खान यांनी स्वतः बिग बींशी याबाबत चर्चा केली होती आणि अमिताभही चित्रपटासाठी तयार होते. मात्र, त्या काळात अमिताभ बच्चन प्रचंड व्यस्त होते. 'कुर्बानी' चित्रपटाचे शूटिंग सुरू करण्यासाठी त्यांना किमान सहा महिन्यांचा कालावधी हवा होता. मात्र, चित्रपटाचे शूटिंग लवकर सुरू करणे फिरोज खान यांच्यासाठी गरजेचे होते. त्याकडे सहा महिने थांबणे शक्य नसल्याने अखेर त्यांनी अमिताभ बच्चन यांना नकार दिला आणि ही भूमिका विनोद खन्ना यांच्याकडे सोपविली. हा निर्णय विनोद खन्नांच्या आयुष्यातील निर्णायक ठरला. 'कुर्बानी' हा चित्रपट केवळ बॉक्स ऑफिस हिट ठरला नाही तर बॉलिवूडच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टर्निंग पॉइंट ठरला. अमिताभ बच्चन यांनी नाकारलेली हीच भूमिका विनोद खन्नांच्या करिअरला नवी कलाटणी देणारी ठरली.



# आधार कार्ड पर अब सिर्फ फोटो और क्यूआर कोड होगा

## फोटोकॉपी से होने वाले मिसयूज को रोकने का प्लान




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय विशिष्ट पहचान प्राधिकरण आधार कार्ड नए सिरे से डिजाइन करने पर विचार कर रहा हैं। भविष्य में आधार कार्ड केवल धारक की फोटो और क्यूआर कोड वाला हो सकता हैं। यानी कार्ड पर आधार नंबर, नाम-पता, जन्मतिथि अन्य बायोमीट्रिक जानकारी नहीं होंगी।

भारतीय विशिष्ट पहचान प्राधिकरण के सीईओ भुवनेश कुमार ने एक ऑनलाइन कॉन्फ्रेंस में बताया कि आधार की कॉपी से होने वाले मिसयूज को रोकने के लिए नियम बनाए जा रहें हैं। इसके बाद आधार कार्ड देखने और उसकी फोटोकॉपी जमा कराने पर भी दूसरे किसी व्यक्ति, संस्था, कार्यालय या कंपनियों के पास आपकी डिटेल नहीं जाएगी।

खासतौर से होटलों, टेलीकॉम सिम बेचने वाले, कॉन्फ्रेंस, सेमिनार वगैरह के आयोजक आपके आधार की फोटोकॉपी का गलत इस्तेमाल नहीं कर पाएंगे। भारतीय विशिष्ट पहचान प्राधिकरण दिसंबर २०२५ में नए नियम लागू करने की योजना बना रहा हैं।

# मायलेकाने करून दाखविले! छोट्या रूममध्ये सुरू केली शेती

**सक्सेस स्टोरी**

## आता प्रतिदिन करताय ४० हजार रुपयांची कमाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्वप्न मोठे असो वा लहान, त्यामागे मेहनत आणि जिद्द असेल तर यश नक्की मिळते. हेच एका माय लेकाने यांनी सिद्ध करून दाखविले आहे. एका छोट्याशा छंदापासून सुरू झालेला त्यांचा मशरूम शेतीचा प्रवास आज हजारो रुपयांचे उत्पन्न, अनेकांना रोजगार आणि नव्या पिढीसाठी प्रेरणा ठरत आहे. पारंपरिक शेतीला आधुनिक दृष्टिकोनाची जोड दिल्यास तीही यशस्वी व्यवसाय बनू शकते, याचे जीवंत उदाहरण म्हणजे ही आई व मुलगा यांची जोडी.





### छंदातून व्यवसायाकडे वाटचाल

केरळमधील लीना थॉमस आणि त्यांचा मुलगा जितू थॉमस यांनी सुरूवातीला मशरूम शेतीकडे केवळ छंद म्हणून पाहिले. घरच्या घरी प्रयोग करत त्यांनी या शेतीची मूलतत्त्वे समजून घेतली. सुरूवातीला अपयश आले, नुकसानही सहन करावे लागले. मात्र हार न मानता त्यांनी प्रत्येक चुकांतून शिकण्याचा प्रयत्न केला. कालांतराने हा छंद अर्धवेळ व्यवसायात बदलला आणि पुढे तो पूर्णवेळ उत्पन्न देणारा उद्योग बनला.

### एका मशरूम बेडपासून सुरूवात

हा संपूर्ण प्रवास केवळ एका मशरूम बेडपासून सुरू झाला. जितूने आपल्या आईसोबत मिळून फार साध्या साधनसामग्रीत मशरूम लागवड सुरू केली. अनुभव वाढत गेला तसे त्यांनी उच्च-घनतेची मशरूम शेती स्वीकारली. पुढे स्वतःची स्पॉन लॅब उभारून उत्पादनाची गुणवत्ता आणि प्रमाण दोन्ही वाढविण्यात यश मिळविले.

### ५००० चौरस फुटांवर उभा राहिलेला फार्म

आज पिरावोम येथे असलेला 'लीनाज मशरूम फार्म' सुमारे ५००० चौरस फूट क्षेत्रात पसरलेला आहे. या फार्ममध्ये जवळपास २०,००० मशरूम बेड असून महिन्याला सुमारे ४ टन ताज्या मशरूमचे उत्पादन घेतले जाते. या फार्ममध्ये १५ कामगार कार्यरत आहेत, त्यापैकी जवळपास ८० टक्के महिला कर्मचारी आहेत. त्यामुळे हा उपक्रम महिला सक्षमीकरणाचेही उदाहरण ठरत आहे.

### नियंत्रित वातावरणात आधुनिक शेती

मशरूम शेतीसाठी विशिष्ट तापमान आणि आर्द्रता आवश्यक असते. साधारण ३० अंश सेल्सिअसपेक्षा कमी तापमान राखण्यासाठी फार्मची विशेष रचना करण्यात आली आहे. नियंत्रित वातावरणामुळे कमी जागेत अधिक उत्पादन घेणे शक्य झाले असून पीक सातत्याने मिळते.

### गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य

मशरूम हे अत्यंत नाजूक पीक असल्याने थोडासा निष्काळजीपणा संपूर्ण उत्पादनावर परिणाम करू शकतो. तापमान, स्वच्छता आणि कीटक नियंत्रण याकडे लीना आणि जितू विशेष लक्ष देतात. दर्जेदार उत्पादन हाच त्यांच्या यशाचा मुख्य आधार आहे.

### दररोज ४० हजार रुपयांपर्यंत कमाई

या व्यवसायातून लीना आणि जितू यांना दररोज सरासरी ४० हजार रुपयांपर्यंत उत्पन्न मिळते. मशरूम थेट किरकोळ विक्रेत्यांना विकले जात असल्याने मध्यस्थ टाळले जातात आणि नफा अधिक राहतो.

### उत्पादनासोबत प्रशिक्षण आणि मार्गदर्शन

ताज्या मशरूमव्यतिरिक्त ते मशरूम स्टार्टर किट्स, स्पॉन, ग्रो रूम उभारणी आणि शेतीसंबंधी सल्ला सेवा देतात. इच्छुक शेतकरी व तरुणांसाठी प्रशिक्षण कोर्सेसही उपलब्ध करून दिले जातात.

### नव्या पिढीसाठी प्रेरणादायी कथा

लीना आणि जितू यांची यशोगाथा हे दाखविते की योग्य नियोजन, आधुनिक तंत्रज्ञान आणि मेहनतीच्या जोरावर शेतीतूनही उज्ज्वल भविष्य घडविता येते. साध्या छंदातून सुरू झालेला हा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायक आहे.

# स्टीलची, तांब्याची की प्लास्टिकची?

## कोणत्या बाटलीतून पाणी पिणे आरोग्यासाठी आहे फायदेशीर?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दररोज वापरल्या जाणाऱ्या पाण्याच्या बाटल्या आरोग्यावर खोलवर परिणाम करू शकतात. मात्र, त्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. जिमपासून ते ऑफिस डेस्कपर्यंत आणि बेडसाईड टेबलपर्यंत. बाटल्या खरेदी करताना जास्त विचार केला जात नाही. बाटली कोणत्या मटेरियलपासून बनलेली आहे किंवा ती रोजच्या वापरासाठी सुरक्षित आहे की नाही याचा विचार फार कमी लोक करतात.

बाटल्या बनविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्यातून हानिकारक रसायने बाहेर पडू शकतात. पाण्याची चव बदलू शकते किंवा योग्यरित्या स्वच्छ न केल्यास बॅक्टेरिया देखील निर्माण होऊ शकतात. त्यामुळे रोजच्या वापरासाठी नेमकी कोणती बाटली वापरणे सुरक्षित आहे हे जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पाण्याच्या बाटल्या या साधारणपणे काच, तांबे, स्टील किंवा प्लास्टिक यापासून बनवलेल्या असतात. तर यापैकी कोणता पर्याय आरोग्यासाठी फायदेशीर आहे याबाबत अधिक माहिती जाणून घेऊ.

काचेच्या बाटल्या पाण्याची मूळ चव टिकवून ठेवतात कारण त्या कोणतीही रसायने सोडत नाहीत. छिद्र नसल्यामुळे बॅक्टेरिया त्यावर चिकटत नाहीत आणि त्या स्वच्छ करणेदेखील सोपे आहे. काचेच्या बाटल्यांबाबत सर्वात खास गोष्ट म्हणजे त्या बीपीएमुक्त असतात.

ॲक्कासानाच्या एका अभ्यासात म्हटले आहे, की काचेच्या बाटल्या आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठी चांगल्या आहेत आणि नैसर्गिक चव आणि स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून देखील चांगल्या आहेत. या बाटल्या प्रवास, ऑफिस, घर अशा वापरांसाठी उत्तम आहेत. मात्र, त्या निसरड्या असतात. त्यामुळे योग्य मजबूत पकड असलेल्या काचेच्या बाटलीची निवड करावी.

### स्टीलची बाटली

स्टीलच्या बाटल्या टिकाऊ, हलक्या आणि उष्णतारोधक असतात. त्यामुळे पाणी बराच काळ गरम आणि थंड राहते. त्या विषारी नसतात, बुरशीमुक्त असतात आणि बीपीएमुक्त असतात. काचेच्या बाटल्यांपेक्षा त्या स्वच्छ करणे थोडे कठीण असते आणि स्वस्त स्टीलच्या बाटल्या स्वच्छ न केल्यास धातूची चव आणि वास येऊ शकतो. वर्ल्ड स्टील असोसिएशनच्या संशोधनानुसार, स्टील हे स्वच्छ आणि मायक्रोप्लास्टिकमुक्त आहे. त्यामुळे ते दैनंदिन वापरासाठी एक उत्तम पर्याय बनते.

### तांब्याची बाटली

तांबे हे एक अँटीमायक्रोबियल आहे जे बॅक्टेरिया मारते आणि पचन सुधारते. जर्नल ऑफ हेल्थ पॉप्युलेशन अँड न्यूट्रिशन स्डटीमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनातूनही या बाटलीच्या अनेक आयुर्वेदिक फायद्यांची खात्री होते.

जर तांब्याच्या बाटलीत जास्त काळ पाणी साठवले गेले किंवा त्यातून जास्त तांबे गळत असेल तर ते तांब्याचे विषारीपणात परिवर्तन करू शकते. त्यामुळे लिव्हर आणि किडनीच्या समस्या उद्भवू शकतात. आम्लयुक्त पेये तांब्याच्या बाटल्यांमध्ये साठवू नयेत. तसेच या बाटल्यांवर अधिक अभ्यास आवश्यक असल्याचे तज्ज्ञ सांगतात.



### प्लास्टिक बाटली

प्लास्टिकच्या बाटल्यांमधून बीपीए रसायने बाहेर पडतात. ही रसायने शरीरात प्रवेश करतात आणि रक्तप्रवाहात मिसळून अवयवांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे कॅन्सर आणि हृदयरोगाचा धोकादेखील वाढू शकतो. कॉनकॉर्डिया विद्यापीठाच्या मते, प्लास्टिकच्या बाटल्या वापरल्याने दरवर्षी तुमच्या शरीरात ९० हजार अतिरिक्त कण येतात. राष्ट्रीय आरोग्य संस्थांच्या अभ्यासानुसार, प्लास्टिकच्या बाटल्या बॅक्टेरियांसाठी निर्मितीचे स्थान आहे. म्हणून प्लास्टिकच्या बाटलीचा वापर टाळावा.

# हिवाळ्यात केळी खावीत की नाही? काय सांगते आयुर्वेद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

केळी हे एक असे सुपरफूड आहे जे शरीरासाठी मल्टीविटामिनच्या गोळीसारखे काम करते. हे फळ वर्षभर सहज उपलब्ध असते, तरीही हिवाळ्यात अनेकजण ते खाणे टाळतात.



केळी खाल्ल्याने थंडी वाजते किंवा सर्दी-खोकल्याचा त्रास होतो, असा लोकांचा समज आहे. मात्र, वस्तुस्थिती यापेक्षा वेगळी आहे. खरे तर केळ हे ऊर्जा, पोटॅशियम, फायबर, व्हिटॅमिन बी६ आणि मॅग्नेशियमचा उत्तम स्रोत आहे. हिवाळ्यात जेव्हा शरीराला अधिक ऊर्जा आणि रोगप्रतिकारक शक्तीची गरज असते, तेव्हा केळे अत्यंत फायदेशीर ठरते. यातील नैसर्गिक साखर त्वरित ऊर्जा देते आणि थंडीच्या दिवसांत येणारा आळस व अशक्तपणा दूर करते. केळ्यातील विद्राव्य फायबर पचनसंस्था सुधारते आणि हिवाळ्यात जाणवणाऱ्या बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून आराम देते. तसेच यातील पोटॅशियम शरीराचे तापमान संतुलित राखण्यास मदत करते आणि स्नायूंचा ताण किंवा वेदना कमी करते. युनायटेड किंग्डममधील लीड्स विद्यापीठाच्या एका अभ्यासानुसार, केळीसारखे उच्च फायबरयुक्त पदार्थ हृदयरोग आणि कोरोनरी हृदयरोगाचा धोका लक्षणीयरीत्या कमी करतात. केळीमधील पोटॅशियम रक्तदाब नियंत्रित करते आणि तुमचा मेंदू अधिक सतर्क ठेवते. जरी केळी पौष्टिकतेने समृद्ध असली तरी, आयुर्वेदिक तत्त्वांनुसार, काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. तुमच्या पोटात जळजळ होत असेल (पित्त दोष) तर केळी काळजीपूर्वक खा.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

## संपादकीय

### स्वतःची संस्कृती, स्वतःचा विचार

आजच्या डिजिटल युगात माहितीचा महापूर आहे. मात्र त्या माहितीचे रूपांतर ज्ञानात कितपत होते, हा गंभीर प्रश्न आहे. सोशल मीडियाच्या प्रभावाखाली स्वतःच्या संस्कृतीकडे, परंपरेकडे आणि धर्माकडे उपेक्षेने पाहणे ही जणू काही 'बुद्धिमत्तेची' खूण असल्याचा गैरसमज वाढताना दिसतो. विशेषतः हिंदू सनातन संस्कृतीबाबत अर्धवट माहितीच्या आधारे टीका करण्याची प्रवृत्ती चिंताजनक आहे. धर्म, संस्कृती किंवा परंपरा यांची चिकित्सा करणे चुकीचे नाही; उलट ती आवश्यकच आहे. मात्र ही चिकित्सा अभ्यासपूर्ण, वस्तुनिष्ठ आणि जबाबदार असावी. फेसबुक, इंस्टाग्रामसारख्या माध्यमांवरील अपुरी किंवा विकृत माहिती अंतिम सत्य मानून स्वतःच्याच सांस्कृतिक वारशावर प्रहार करणे हे आत्मघातकी ठरू शकते. कोणत्याही टीकेआधी आपल्या ग्रंथपरंपरेचा, इतिहासाचा आणि तत्त्वज्ञानाचा किमान अभ्यास आजच्या युवा पिढीसाठी आवश्यक आहे.

हिंदू संस्कृती ही केवळ धार्मिक कर्मकांडांपुरती मर्यादित नसून ती जीवनपद्धती आहे. 'वसुधैव कुटुंबकम्'सारखा व्यापक मानवतावादी विचार जगाला देणारी ही संस्कृती आहे. शून्याची संकल्पना असो वा ध्यान, योग आणि तर्कशास्त्रभारतीय परंपरेने जागतिक ज्ञानपरंपरेत मोलाची भर घातलेली आहे. अशा समृद्ध वारशाकडे न्यूनगंडाने पाहणे हे प्रगतीचे लक्षण नव्हे. आज सर्वाधिक गरज आहे ती आत्मओळखीची. पाश्चात्य संस्कृतीतील चांगले स्वीकारताना स्वतःच्या मूल्यांना विसरणे ही आधुनिकतेची अट नाही. इतिहास साक्षी आहे की भारताने नेहमीच आक्रमणांना, अन्यायाला आणि सांस्कृतिक दडपशाहीला प्रतिकार केला आहे. हा प्रतिकार केवळ शस्त्रांनी नव्हे, तर विचारांनी आणि मूल्यांनी झाला आहे. याचबरोबर अंतर्गत एकीचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. जाती, पंथ, मतभेद यांच्या पलीकडे जाऊन सांस्कृतिक ऐक्य साधले नाही, तर बाह्य शक्तींना संधी मिळते. समाज आतून कमकुवत झाला की त्याचे परिणाम पुढील पिढ्यांना भोगावे लागतात.

तरुण पिढीपुढे आज मोठी जबाबदारी आहे. अफवांऐवजी सत्य शोधणे, परंपरांकडे अंधश्रद्धेने नव्हे तर तर्काने पाहणे, आणि केवळ घोषणांपुरते राष्ट्रप्रेम न ठेवता कृतीतून राष्ट्रउभारणीत सहभागी होणेही काळाची गरज आहे. स्वामी विवेकानंदांचा 'उठा, जागे व्हा आणि ध्येयप्राप्तीशिवाय थांबू नका' हा संदेश आजही तितकाच सुसंगत आहे. धर्माचे रक्षण म्हणजे आक्रमकता नव्हे, तर धर्माच्या मर्माचे आचरण होय. सजग, विचारशील आणि जबाबदार नागरिक घडवणे हेच खरे राष्ट्रधर्म आहे. तर्क, तथ्य आणि सांस्कृतिक स्वाभिमान यांच्या आधारावर पुढे जाणारा समाजच मजबूत राष्ट्राची पायाभरणी करू शकतो. त्यासाठी आजच्या तरुण पिढीने थोर संत, महर्षी, विचारवंत यांच्या विचारांचा अंगीकारत त्या दिशेने पावले टाकत मार्गक्रमण करणे आवश्यक आहे.

# क्षणाचाही भरवसा नसतो, नियतीचा खेळ कोणास कळतो?
# कितीही बुलंद असू दे व्यक्तिमत्त्व; तरी मृत्यू अटळच असतो...!!!

## बारामती विमान अपघात देशासाठी अपरिमित हानी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्राला हादरवून सोडणारा हा विमान अपघात केवळ एक दुर्घटना नसून, अनेक कुटुंबांच्या स्वप्नांचा अंत आहे. या भीषण अपघातात आपण ज्या अमूल्य जीवांना गमावले, त्या वेदना शब्दांत मांडणे अशक्य आहे. आज प्रश्न नाहीत फक्त सन्नाटा आहे. काही बातम्या 'क्लिक'साठी नसतात, काही दृश्ये 'ट्रेंड'साठी नसतात, आणि काही अपघात संपूर्ण देशाचा आवाजच गमावून टाकतात. बारामतीतील हा विमान अपघात फक्त एक क्रॅश नाही, तर त्या चेहऱ्यांची अपूर्ण कहाणी आहे. जे परत येणार होते पण परत येऊ शकले नाहीत. आज ना वाद आहेत, ना आरोप. फक्त एकच भावना श्रद्धा, सन्मान आणि मौन. जे गेले आहेत ते आपल्या माणसांच्या आठवणीत आणि देशाच्या हृदयात सदैव अमर राहतील.

**सर्व दिवंगत आत्म्यांना दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली..!**
**ॐ शांती**



## पिंकी माळीचे अकाली जाणे अत्यंत दुःखद, असह्य



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बारामती येथील विमान दुर्घटनेत फ्लाईट क्रू अटेंडेंट असलेली वरळी येथील रहिवासी, शिवकुमार माळी यांची सुकन्या स्व. पिंकी शिवकुमार माळी हिचे अकाली जाणे अत्यंत दुःखद आणि असह्य आहे. माळी कुटुंबावर कोसळलेल्या या अमाप दुःखात आम्ही सर्वजण त्यांच्यासोबत आहोत. ईश्वर त्यांना हे दुःख सहन करण्याची ताकद देवो, आणि त्या निष्पाप आत्म्यास सद्गती लाभो, हीच अंतःकरणातून प्रार्थना. दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली..!

## ग्वाल्हेरची लेक, जिने अखेरच्या श्वासापर्यंत निभावले कर्तव्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




महाराष्ट्रात झालेल्या चार्टर विमान अपघाताने संपूर्ण देश हादरून गेला आहे. मात्र या दुर्घटनेने ग्वाल्हेरला अशी एक जखम दिली आहे, की जी कदाचित कधीही भरून येणार नाही. या विमानाची धुरा ग्वाल्हेरच्या होतकरू लेकीकडे शांभवी पाठक हिच्या हाती होती. एक तरुण, शिस्तबद्ध आणि धैर्यशील वैमानिक, जी व्हीआयपी चार्टर उड्डाणांची मोठी जबाबदारी समर्थपणे पार पाडत होती. याच उड्डाणात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार हेही प्रवासी होते. अपघाताच्या क्षणी शांभवीने परिस्थितीशी दोन हात करत विमान वाचविण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न केले. मात्र नियतीला काही वेगळेच मान्य होते. आज शांभवी पाठक आपल्यात नाहीत. पण तिचे धैर्य, कर्तव्यनिष्ठा आणि बलिदान फक्त ग्वाल्हेरलाच नव्हे, तर संपूर्ण देशाला सदैव अभिमान वाटावा असेच आहे. ज्या लेकीने अखेरच्या क्षणापर्यंत हार मानली नाही, तिच्यासाठी एक क्षण मौन पाळूया.

# अजितदादांच्या अखेरच्या सलामीला झाले मिसफायर
## पोलिसांनी दिली कबुली; कारण आले समोर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पुणे : राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष ना. अजितदादा पवार यांचे दोन दिवसांपूर्वी भीषण विमान अपघातात निधन झाले. बारामती एअरपोर्टजवळ अजितदादांचे विमान लँडिंग करत असताना कोसळले. यात अजितदादांसह पाच जणांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने महाराष्ट्राला मोठा धक्का बसला आहे. राजकारणातील उमदे व्यक्तिमत्त्व असलेल्या अजितदादांची अकाली एक्झिट महाराष्ट्राला सुन्न करणार ठरली. अजितदादा यांच्यावर विद्या प्रतिष्ठानच्या



मैदानात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कारावेळी शासकीय मानवंदना देण्यात आली तेव्हा एका कर्मचाऱ्याकडून मिसफायर झाल्याचा व्हिडिओ समोर येताच मोठी खळबळ उडाली. त्यानंतर पोलिसांनी समोर येत मिसफायर झाल्याची कबुली दिली आहे.

अजितदादांना पोलिसांकडून अखेरची सलामी देण्यात येत असताना ही घटना घडली. पोलिसांकडून सलामी देताना तीन राऊंड हवेत फायर केले जातात. यावेळी समोरच्या रांगेतील पोलिसाकडून पहिला राऊंड फायर केल्यानंतर दुसरा राऊंड फायर करताना बंदुकीतून मिसफायर झाले. सुदैवाने बंदुकीतून सुटलेली ही गोळी कोणाला लागली नाही. पोलिसांनी देखील कबुली देत मिसफायरवर स्पष्टीकरण दिले आहे.

**मिसफायरवर पोलीस काय म्हणाले?**

मिसफायरवर स्पष्टीकरण देताना पोलीस म्हणाले, की ना. अजितदादा पवार यांना अखेरची सलामी देताना मिसफायरिंग झाले होते. या बुलेट्समध्ये बंदुकीच्या गोळीप्रमाणे इजा होण्याची क्षमता नसते शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करताना सलामीसाठी वापरण्यात येणारे राऊंड डमी असतात. सलामीसाठी तीन राऊंड फायर केले जातात तेव्हा या गोळ्या वापरल्या जातात.

### अमित शाह अन् मुख्यमंत्र्यांपासून हाकेच्या अंतरावर घटना

हा प्रकार घडला तेव्हा समोरच केंद्रीय गृहमंत्री ना. अमित शाह, मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, शरद पवार आणि राज्य मंत्रिमंडळातील दिग्गज नेते उपस्थित होते. अजितदादा पवार यांचे पुत्र पार्थ आणि जय पवार हे पार्थिवाला मुखाग्नी देत असतानाच हा प्रकार घडला. सुदैवाने बंदुकीतून सुटलेली गोळी कोणालाही लागली नाही. मात्र, अशा अत्यंत संवेदनशील प्रसंगी झालेल्या या चुकीमुळे अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. त्यानंतर पोलिसांनी हे स्पष्टीकरण दिले आहे.

# सोन्या-चांदीच्या भावात 'महाभूकंप'
## इतिहासातील सर्वांत मोठी घसरण; लाखात कमावणाऱ्यांचे कोट्यवधी बुडाले

**ग्लोबल महातेज वृत्तसवा**

अमळनेर : गेल्या काही दिवसांपासून विक्रमी पातळी गाठणाऱ्या सोने-चांदीच्या किमतींना शुक्रवार, दि. ३० जानेवारी रोजी अचानक जोरदार धक्का बसला. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर चांदीच्या दरात इतिहासातील सर्वांत मोठी एकदिवसीय घसरण नोंदविली गेली. काही वेळासाठी ४ लाख रुपयांच्या पुढे जाण्याची शक्यता दिसणारी चांदी थेट तीन लाख ३४ हजार रुपये प्रतिकिलोच्या आसपास घसरली.



शुक्रवारी दुपारी सुमारे पावणेचार वाजता मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर चांदीचा वायदा भाव तब्बल ६६ हजार रुपयांनी म्हणजेच जवळपास १६.७० टक्क्यांनी घसरला. ही आतापर्यंतची सर्वांत मोठी एकदिवसीय घसरण मानली जात आहे. याचवेळी सोन्याच्याही किमतींमध्ये मोठी पडझड झाली. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर सोने सुमारे ७ टक्क्यांनी घसरत एक लाख ५८ हजार रुपये प्रति १० ग्रॅमच्या आसपास आले.

विशेष म्हणजे अवघ्या एक दिवस आधीच चांदी ४ लाख रुपयांच्या अगदी जवळ पोहोचली होती. मात्र शुक्रवारी सकाळपासूनच मौल्यवान धातूंवर विक्रीचा दबाव दिसू लागला. या दबावाचा सर्वाधिक फटका चांदीला बसला, तर सोन्यालाही मोठ्या प्रमाणात तोटा सहन करावा लागला. दुपारपर्यंत सोन्याचा दर १० हजार ९५४ रुपयांनी घसरून एक लाख ५८ हजार ४४९ रुपये प्रति १० ग्रॅमवर आला. सोन्यात एका दिवसात सुमारे ६.५ टक्क्यांची घसरण नोंदविली गेली.

**सोने एवढे महाग का झाले?**

जानेवारीत सोन्याच्या दरात प्रचंड तेजी पाहायला मिळाली होती. यामागे जागतिक पातळीवर वाढलेली मागणी हे मुख्य कारण आहे. आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांनी क्रिप्टोपासून ते सेंट्रल बँकांपर्यंत सोन्याकडे सुरक्षित गुंतवणूक म्हणून पाहायला सुरूवात केली. या वातावरणात अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आक्रमक भूमिकेमुळेही तणाव वाढला. इराणसोबतच्या अणुकराराबाबत अमेरिकेने दबाव वाढविला असून, त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने अमेरिका आणि इस्रायलविरोधात कारवाईची धमकी दिली आहे. त्यामुळे आणखी एका संघर्षाची शक्यता निर्माण झाली आणि सोन्याकडे सुरक्षित पर्याय म्हणून पाहिले गेले. याशिवाय क्रिप्टो क्षेत्रातील मोठी कंपनी टेदरच्या सीईओंनी त्यांच्या गुंतवणूक पोर्टफोलिओपैकी १० ते १५ टक्के हिस्सा सोन्यात गुंतविण्याची योजना जाहीर केली होती. कंपनीची रणनीती सुमारे १० टक्के गुंतवणूक बिटकॉइनमध्ये आणि १० ते १५ टक्के सोन्यात करण्याची आहे. या सगळ्या घडामोडींमुळे सोन्याच्या दरांना जोरदार आधार मिळाला होता. मात्र आता नफेखोरी आणि जागतिक संकेतांमुळे सोने-चांदीच्या दरात अचानक मोठी घसरण पाहायला मिळत आहे.

# '..तर उद्याच होणार शपथविधी'
## सुनेत्राताई पवारांचे नाव घेत ना. छगन भुजबळ यांनी दिले स्पष्ट संकेत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पुणे : उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनानंतर राज्याचे उपमुख्यमंत्रीपद रिक्त झाले आहे. त्या जागी अजितदादांच्या पत्नी सुनेत्राताई पवार यांच्याकडे ही जबाबदारी सोपविण्यात येण्याची दाट शक्यता व्यक्त होत आहे. मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत झालेल्या बैठकीनंतर खुद्द ना. छगन भुजबळ यांनी तसे स्पष्ट संकेत दिले आहेत.





भुजबळ म्हणाले, की अजितदादांच्या दुर्दैवी निधनाने आमच्या सगळ्यांची झोप उडाली आहे. परंतु त्यांच्याकडे असलेली जबाबदारी कुणाकडे तरी देऊन पुढे काम चालवावे लागेल. उद्या शनिवार, दि. ३१ जानेवारी रोजी पक्षाच्या विधिमंडळ सदस्यांची बैठक बोलावली आहे. त्यामध्ये पक्षनेता निवडला जाईल. सुनेत्राताईंकडे हे पद द्यावे, अशी अनेकांची मागणी आहे, ते चूक नाही. तेच करायचा पाहिजे. पक्षनेता निवडीसंदर्भातील निर्णय शनिवारच्या आमदारांच्या बैठकीत होईल.

उपमुख्यमंत्री पदाची जागा रिक्त आहे. ती सुनेत्रा वहिनींकडे देण्याकडे आमचे लक्ष आहे. बाकी काय निर्णय घ्यायचा तो पक्ष ठरवेल तसे होईल. आमदारांच्या बैठकीत एकमत झाले तर लगेचच शपथविधी होईल.

दरम्यान, ना. भुजबळ यांनी स्पष्टपणे सुनेत्राताई पवार यांच्या शपथविधीबाबत संकेत दिले आहेत. त्यापूर्वी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला होता. त्यांनी मात्र कुठलीही शक्यता वर्तविली नव्हती. मात्र, शनिवारी आमदारांची बैठक बोलावली, हे निश्चित आहे. अनेक आमदारांनी जाहीरपणे सुनेत्राताई पवारांच्या नावाचा आग्रह धरलेला आहे. तशा प्रतिक्रिया माध्यमांतून दिलेल्या आहेत.

सुनील तटकरे म्हणाले, की आज आम्ही मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. मात्र आपण सर्वजण दुःखात आहोत. अशा परिस्थितीत पवार कुटुंबीयांशी चर्चा करणे आमच्यासाठी अवघड आहे. धार्मिक विधी झाल्यानंतर आम्ही कुटुंबीयांशी चर्चा करू. वहिनींशी आणि पवार कुटुंबीयांशी बोलणे आमच्यासाठी अवघड आहे. परंतु त्यांच्याशी सविस्तरपणे आम्ही नक्की बोलू.

**ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस :**

# अल्काराझची फायनलमध्ये मुसंडी!
## ५ तास २७ मिनिटांच्या 'उपांत्य' लढतीत झ्वेरेव्हला लोळवले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मेलबर्न : टेनिस जगतातील नवा सुपरस्टार कार्लोस अल्काराझने शुक्रवार, दि. ३० जानेवारी रोजी मेलबर्न पार्कच्या रॉड लेव्हर एरिनावर नवा इतिहास रचला. ऑस्ट्रेलियन ओपनच्या इतिहासातील सर्वात प्रदीर्घ अशा उपांत्य फेरीत, पायाचे स्नायू दुखावले असतानाही लंगडत लंगडत निव्वळ जिद्दीच्या जोरावर अल्काराझने अलेक्झांडर झ्वेरेव्हचा पराभव केला. ५ तास २७ मिनिटे चाललेल्या या 'मॅरेथॉन' लढतीत विजय मिळवत स्पॅनिश खेळाडूने पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियन ओपनच्या फायनलमध्ये धडक मारली आहे.



**पाच सेटचा श्वास रोखून धरणारा थरार**

जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या अल्काराझने सुरुवातीचे दोन सेट ६-४, ७-६ ने जिंकून सामन्यावर पकड मिळवली होती. मात्र, तिसऱ्या सेटमध्ये सामन्याला वेगळेच वळण मिळाले. अलकाराझच्या 'कॅम्प्स' येऊ लागले आणि तो वेदनेने व्याकुळ झाला. झ्वेरेव्हने या संधीचा फायदा घेत पुढचे दोन सेट टायब्रेकरमध्ये (६-७, ६-७) जिंकून सामन्यात २-२ अशी बरोबरी साधली.

निर्णायक पाचव्या सेटमध्ये अल्काराझ अक्षरशः लंगडत खेळत होता, पण त्याच्या मनातील जिंकण्याची ऊर्मी कमी झाली नव्हती. त्याने शेवटच्या सेटमध्ये झ्वेरेव्हची सर्व्हिस मोडीत काढत ७-५ असा विजय मिळवला आणि त्याच्या चाहत्यांनी एकच जल्लोष केला.

**सामन्यातील विक्रम**

सर्वांत मोठी सेमी फायनल ऑस्ट्रेलियन ओपनच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वात जास्त काळ चाललेली उपांत्य फेरी ठरली. करिअर ग्रँडस्लॅमच्या उंबरठ्यावर अवघ्या २२ व्या वर्षी चारही ग्रँडस्लॅम स्पर्धांच्या अंतिम फेरीत पोहोचणारा अल्काराझ हा 'ओपन एरा'मधील सर्वांत तरुण खेळाडू ठरला आहे. तिसरा प्रदीर्घ सामना मेलबर्न पार्कच्या इतिहासातील २०१२ ची फायनल आणि २०२३ मधील अँडी मरे विरुद्ध कोकिनाकिस यांच्यातील सामन्यानंतरचा हा तिसरा सर्वांत मोठा सामना ठरला.

**रविवारी कोणाशी होणार झुंज?**

आता संपूर्ण जगाचे लक्ष रविवार, दि. १ फेब्रुवारीच्या महाअंतिम फेरीकडे लागले आहे. सातवे ग्रँडस्लॅम जेतेपद मिळविण्यासाठी अल्काराझची सज्ज झाला आहे. अंतिम सामन्यात त्याची लढत नोव्हाक जोकोविच विरुद्ध यानिक सिनर यांच्यातील विजेत्याशी होईल. जर अल्काराझने रविवारी बाजी मारली, तर तो राफेल नदालचा विक्रम मोडीत काढून 'करिअर ग्रँडस्लॅम' पूर्ण करणारा सर्वात तरुण खेळाडू ठरेल.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे
तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# हनुमानजींच्या चरित्रातून तरुणांना मिळणारे जीवनमूल्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजचा तरुण वर्ग हा समाजाचा कणा आहे. मात्र वेगवान जीवनशैली, स्पर्धा, तणाव, अपेक्षांचे ओझे आणि दिशाभूल करणारे आकर्षण यामध्ये अनेक तरुण गोंधळलेले दिसतात. अशा काळात जर एखादे चरित्र आजही तितकेच सुसंगत, प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरते, तर ते म्हणजे श्रीरामभक्त हनुमानजींचे चरित्र. हनुमानजी म्हणजे केवळ अपार शक्तीची देवता नव्हे, तर जीवन कसे जगावे याचा आदर्श आहेत. त्यांच्या प्रत्येक कृतीतून आजच्या तरुणांना अनेक मौल्यवान जीवनमूल्ये शिकता येतात.

### १) आत्मविश्वास

हनुमानजींना लंकेकडे पाठविताना जांबुवंतांनी त्यांची शक्ती आठवण करून दिली. त्या क्षणी हनुमानजींनी स्वतःवर विश्वास ठेवला आणि अशक्य वाटणारे कार्य सहज साध्य केले. आजच्या तरुणांनीही स्वतःवर विश्वास ठेवल्यास कोणतीही अडचण अडथळा ठरत नाही.

### २) नम्रता

यश असूनही अहंकार नाही अपरिमित शक्ती असूनही हनुमान कधीही अहंकारी झाले नाहीत. 'मी श्रीरामांचा दास आहे' हीच त्यांची ओळख होती. आज यश, पैसा, पद यामुळे माणूस पटकन अहंकारी होतो; हनुमानजी शिकवतात, की नम्रताच खरे मोठेपण आहे.

### ३) निष्ठा आणि एकनिष्ठता

हनुमानजींची रामभक्ती ही स्वार्थरहित होती. पद, प्रसिद्धी किंवा अपेक्षा काहीच नव्हती फक्त कर्तव्य. आजच्या तरुणांसाठी हे मोठे धडे आहेत. कामात प्रामाणिकपणा आणि निष्ठा असेल, तर यश आपोआप येते.



### ४) धैर्य

संकटांना न घाबरण्याची शिकवण लंकेत एकट्याने प्रवेश करणे, अशोक वाटिकेतील संघर्ष, लंकेला आग लावणेहे सारे धैर्याचे प्रतीक आहे. समस्या आल्या की पळ काढण्याऐवजी त्यांना सामोरे जाण्याची वृत्ती तरुणांनी अंगीकारली पाहिजे.

### ५) विवेक

हनुमानजींनी कधीही शक्तीचा गैरवापर केला नाही. आवश्यक तेवढीच शक्ती, योग्य वेळी आणि योग्य कारणासाठी वापरली. आजच्या तरुणांनीही ज्ञान, पैसा, तंत्रज्ञान यांचा वापर विवेकाने करणे आवश्यक आहे.

### ६) सेवाभाव

स्वतःपेक्षा समाज मोठा असा संदेश देणारी हनुमानजींची संपूर्ण जीवन सेवा समर्पणाने भरलेली आहे. स्वतःसाठी काहीच नको, समाज आणि कर्तव्य प्रथम. आज समाजात बदल घडवायचा असेल, तर सेवाभावाची मानसिकता आवश्यक आहे.

### ७) संयम

रागावर आणि भावनांवर नियंत्रण अपमान, आव्हाने असूनही हनुमानजी कधीही भावनेच्या भरात चुकीचा निर्णय घेत नाहीत. आजच्या तरुणांसाठी संयम हे यशाचे महत्त्वाचे शस्त्र आहे.

### ८) सातत्य आणि मेहनत

हनुमानजी एका दिवसात महान झाले नाहीत. सतत साधना, परिश्रम आणि निष्ठेमुळे ते आदर्श ठरले. आजच्या तरुणांनी 'शॉर्टकट'ऐवजी मेहनतीवर विश्वास ठेवायला हवा. हनुमानजींचे चरित्र हे केवळ धार्मिक कथानक नसून जीवन घडविणारे तत्त्वज्ञान आहे. आत्मविश्वास, नम्रता, निष्ठा, धैर्य, विवेक, संयम आणि सेवाभावहीच खरी यशाची सूत्रे आहेत. आजच्या तरुणांनी जर हनुमानजींचे ही जीवनमूल्ये आत्मसात केली, तर ते केवळ स्वतःचेच नव्हे तर समाजाचे आणि देशाचे भविष्य उज्ज्वल करू शकतील.

**जय श्रीराम ।**
**जय बजरंगबली ॥**

# व्यक्तीच्या कर्मानुसार फळ देणारे शनी देव



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय अध्यात्मात कर्मसिद्धांत हा जीवनाचा कणा मानला जातो. मनुष्य जे पेरतो, तेच त्याला उगवून मिळते या अटल सत्याचे साक्षात प्रतीक म्हणजे शनी देव. म्हणूनच त्यांना प्रत्येक व्यक्तीच्या कर्मानुसार फळ देणारे देव म्हणून ओळखले जाते. शनी देव केवळ भयाची देवता नसून, ते मानवाला योग्य मार्गावर आणणारे कठोर पण न्यायी मार्गदर्शक आहेत.
शनी देव कोणाच्याही रूप, संपत्ती, पद किंवा प्रतिष्ठेकडे पाहत नाहीत. राजा असो वा रंक, श्रीमंत असो वा गरीब सर्वांनाच त्यांच्या कर्मांच्या कसोटीवर तपासले जाते. जे सत्य, प्रामाणिकपणा, कष्ट, संयम आणि नैतिकतेचा मार्ग स्वीकारतात, त्यांच्यासाठी शनी देव हळूहळू पण निश्चितपणे उन्नतीची दारे उघडतात.
प्रारंभी संघर्ष, अडथळे व विलंब जाणवतो; मात्र त्यामागे व्यक्तीला अधिक सक्षम, शिस्तबद्ध व परिपक्व बनविण्याचा उद्देश असतो.
दुसरीकडे जे लोक फसवणूक, अन्याय, दंभ, अहंकार आणि अधर्माचा मार्ग अवलंबतात, त्यांना शनी देव त्यांच्या कृत्यांची जाणीव करून देतात. ही जाणीव कधी अपयशाच्या रूपाने, कधी मानसिक अस्वस्थतेच्या रूपाने, तर कधी सामाजिक किंवा आर्थिक अडचणींच्या स्वरूपात प्रकट होते. शनी देवांची शिक्षा तत्काळ मिळेलच असे नाही; ती काळाच्या ओघात, अचूक वेळ साधून येते. म्हणूनच त्यांना काळाचा न्यायाधीश असे संबोधले जाते.

शनी देव मानवाला थेट नष्ट करत नाहीत; ते सुधारण्याची संधी देतात. संकटे ही शिक्षा नसून आत्मपरीक्षणाची संधी आहे, हा संदेश शनी देव देतात. चुका मान्य करून योग्य मार्ग स्वीकारल्यास शनी देवांची कठोरता कृपेत बदलते. म्हणूनच शनिवारी संयम, मौन, दान, सेवा व सत्याचरणाला विशेष महत्त्व दिले जाते.
आजच्या धावपळीच्या, स्पर्धात्मक युगात शनी देवांचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. शॉर्टकट, फसवणूक आणि तात्पुरते यश यापेक्षा कष्ट, शिस्त आणि प्रामाणिकपणा यांचे मूल्य दीर्घकालीन असते, हे शनिदेव शिकवतात. त्यामुळे शनी देवांची उपासना म्हणजे केवळ तेल वाहणे नव्हे, तर आपल्या विचारांमध्ये आणि कृतींमध्ये शुद्धता आणणे होय.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते, की ज्याचे कर्म शुद्ध, मन स्वच्छ आणि हेतू प्रामाणिक आहेत त्याच्यासाठी शनी देव कधीही भयाचे कारण ठरत नाहीत. उलट अशा व्यक्तीसाठी ते संकटातही मार्ग दाखविणारे, संयमाचे बळ देणारे आणि न्यायाचे रक्षण करणारे देव ठरतात.

# शनिवार आत्मबळ, श्रद्धा आणि संयम जागवणारा हनुमानजींचा पावन वार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शनिवार हा आठवड्यातील केवळ एक दिवस नसून आत्मचिंतन, श्रद्धा आणि अंतर्मनातील शक्ती जागवणारा पवित्र वार आहे. या दिवशी वीर, वानरराज आणि रामभक्त हनुमानजींची उपासना केली जाते. संकटांवर मात करण्याचे धैर्य, मनावर संयम ठेवण्याची ताकद आणि कर्तव्याशी निष्ठा राखण्याची प्रेरणा हनुमानजींच्या चरित्रातून मिळते.

अपरिमित बल, अपार पराक्रम आणि अद्वितीय भक्ती यांचा संगम म्हणजे हनुमानजी. परंतु त्यांच्या शक्तीइतकीच त्यांची नम्रता, विवेक आणि सेवाभावही महान आहे. शनिवारी हनुमान चालिसा, सुंदरकांडाचे पठण, प्रभू श्रीरामनामाचा जप किंवा दीपदान केल्याने मनातील नकारात्मक विचार दूर होतात, आत्मविश्वास बळकट होतो आणि जीवनातील अडचणींना सामोरे जाण्याचे सामर्थ्य मिळते.

हा वार संयमाची कसोटी पाहणारा आहे. राग, अहंकार, अधीरता यावर विजय मिळवून शांत मनाने निर्णय घेण्याची शिकवण शनिवार देतो. हनुमानजींची उपासना केल्याने केवळ शारीरिक किंवा मानसिक बळच नव्हे, तर नैतिक बळही प्राप्त होते. संकटाच्या काळात खचून न जाता धैर्याने उभे राहण्याची ऊर्जा भक्तांच्या अंतःकरणात निर्माण होते. म्हणूनच शनिवार हनुमानजींचा वार हा श्रद्धेने नतमस्तक होण्याचा, आत्मबळ जागविण्याचा आणि संयमाच्या मार्गावर दृढपणे चालण्याचा संदेश देतो. जीवनातील प्रत्येक आव्हानावर विजय मिळविण्यासाठी आवश्यक असलेली शक्ती आणि शांती या पवित्र वारी अनुभवायला मिळते.




**जय श्रीराम ।**
**जय बजरंगबली ॥**

# झटक्यात दूर होईल वास्तुदोष!

## फक्त शनिवारी करा हा सोपा उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्यासोबत अनेकदा असे घडते की घरात सगळे सुरळीत सुरू असते. मात्र त्यानंतर अचानक घरावर संकटे येण्यास सुरूवात होतात. आपली आर्थिक परिस्थिती खालावते, कुटुंबातील एखाद्या सदस्याला आरोग्याच्या समस्या निर्माण होतात, काहीही कारण नसताना घरात गृहकलह वाढतो, पती-पत्नीमध्ये भांडणे होतात. कधी-कधी ही परिस्थिती एवढी नियंत्रणाबाहेर जाते की गोष्ट घटस्फोटापर्यंत पोहोचते, या गोष्टी का घडतात? तर त्यासाठी अनेक कारण असू शकतात. परंतु जर तुमच्या घरात वास्तुदोष निर्माण झाला असेल तरी देखील तुम्हाला या प्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. आपण अनेकदा अशा काही छोट्या-छोट्या चुका करतो. त्यामुळे घरात वास्तुदोष निर्माण होतो. आज आपण घरातील वास्तुदोष दूर करण्यासाठी काही सोपे उपाय जाणून घेणार आहोत. ज्यामुळे तुमच्या घरातील वास्तूदोष दूर होऊन तुमची सर्व संकटांतून सुटका होईल.

### शनिवार भगवान शनी देव यांना समर्पित

हिंदू धर्मशास्त्रानुसार मंगळवार हा वार भगवान हनुमान यांना समर्पित आहे, तर शनिवार हा भगवान शनी देव यांना समर्पित आहे. त्यामुळे या दोन्ही दिवसांना विशेष महत्त्व आहे. घरातील वास्तुदोष दूर करण्यासाठी वास्तुशास्त्रामध्ये अनेक उपाय सांगण्यात आले आहेत. त्यातीलच एक महत्त्वाचा उपाय म्हणजे दर मंगळवारी आणि शनिवारी सकाळी अंघोळ केल्यानंतर देवाची पूजा आणि प्रार्थन करा, त्यानंतर घरात देवाजवळ धूप लावा, हा धूप त्यानंतर संपूर्ण घरात फिरवा. यामुळे घरातील सर्व नकारात्मक ऊर्जा नष्ट होऊन घरात सकारात्मक ऊर्जा प्रवेश करेल. सर्व प्रकारचे वास्तुदोष दूर होतील, असे वास्तुशास्त्रात सांगण्यात आले आहे.

दुसरा महत्त्वाचा उपाय म्हणजे मंगळवारी भगवान हनुमानाची पूजा करावी, तसेच हनुमान चालीसाचा पाठ करावा. तसेच शनिवारी शनी देवाची पूजा करावी, शनी देवांना तेल अर्पण करावे. तसेच शनिवारी पिंपळाच्या झाडाला प्रदक्षिणा माराव्यात. त्यामुळे घरातील सर्व प्रकारचे वास्तुदोष दूर होतात.

## विवाह

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वैधव्यदोष दूर करणारा कुंभविवाह कन्येचा विवाह करणारा पिता इत्यादिकाने 'कन्यावैधव्यहरं कुंभविवाहं करिष्ये' असा संकल्प करून नान्दीश्राद्धांपर्यंत कर्म करून ' मही द्यौ ' इत्यादी मंत्राने कुंभाची स्थापना करावी. नंतर त्या कुंभावर वरुणाच्या प्रतिमेच्या ठिकाणी वरुणाची पूजा करून कलशाच्या मध्यभागी भगवान विष्णूंच्या प्रतिमेच्या ठिकाणी विष्णूंची षोडशोपचार पूजा करून प्रार्थना करावी.

**प्रार्थनेचे मंत्र**

**' वरुणाङ्गस्वरूपाय जीवनानां समाश्रय । पति जीवय कन्यायाश्चिरं पुत्रसुखं कुरु ॥**
**देहि विष्णो वरं देव कन्यां पालय दुःखत।'**

याप्रमाणे प्रार्थना केल्यावर ' विष्णुरूपिणे कुंभाय इमां कन्या श्रीरूपिणी समर्पयामि ' असे वाक्य उच्चारून कन्या कुंभस्वरूपी भगवान विष्णूंना अर्पण करावी. नंतर ' परि त्वा' इत्यादी मंत्रांनी खाली व वर कुंभ व कन्या यांना मंत्राच्या आवृत्तीसह सूत्राने वेष्टन करावे. नंतर कुंभ एकीकडे काढून जलाशयामध्ये टाकून द्यावा. शुद्धोदकाने ' समुद्र ज्येष्ठा ' इत्यादी मंत्रांनी कन्येवर पंचपल्लवयुक्त अभिषेक करावा. ब्राह्मणांना भोजन घालावे. याप्रमाणे कुंभविवाह सांगितला आहे.

# चौदामुखी रुद्राक्ष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चौदामुखी रुद्राक्ष हा 'श्रीमंत रुद्राक्ष' म्हणून सुपरिचित आहे. एक तर तो धारण केल्यावर आर्थिक बाजू सुस्थिर होणे, व्यावसायिक लाभ होऊन मनुष्याची श्रीमंतीकडे वाटचाल होऊ लागते आणि तसेच चौदामुखी हा एक श्रेष्ठ, दुर्मिळ आणि अर्थातच महाग रुद्राक्ष म्हणून ओळखला जातो. चौदामुखी रुद्राक्ष महाग आहे. कारण तो नैसर्गिकरित्या दुर्मिळ आहे. अनेकदा दहामुखी, नऊमुखी वर कृत्रिमपणे मुखे कोरुन त्यांना चौदामुखी म्हणून विकणारे महाभाग या क्षेत्रातही आहेत. क्षकिरण प्रमाणपत्र आपण देतो त्यामागे साधकाची फसवणूक टाळणे हाच उद्देश आहे.
चौदा भुवने म्हणजे भूलोक, भुवर्लोक, स्वर्लोक, महर्लोक, जनलोक, तपोलोक आणि सत्यलोक. आणि ७ पाताळे अतल, वितल, सुतल, रसातल, महातल, तलातल अशा चौदा भुवनांचे प्रतिनिधित्व हा रुद्राक्ष करतो. हा रुद्राक्ष सत्ताप्राप्ती, सुयश, बलप्राप्ती आणि एकंदरीत विजयप्राप्तीसाठी अतिशय महत्त्वाचा मानला जातो. राजकीय महत्वाकांक्षा असलेल्या मंडळींनी या रुद्राक्षधारणाने ती पूर्ण होण्याकडे वाटचाल होऊ लागते. सत्ता आणि उच्चपदप्राप्ती हा या रुद्राक्षाचा मुख्य गुणधर्म आहे.
चौदा विद्यांचे (चार वेद + सहा वेदांगे + न्याय, मीमांसा, पुराणे व धर्मशास्त्र अश्या एकूण चौदा विद्या आहेत.) प्रतिनिधित्व हा रुद्राक्ष करत असल्याने ज्ञानप्राप्ती, शैक्षणिक यशप्राप्ती, उत्कृष्ट स्मरणशक्ती, अर्जित विद्येचा व्यवहारिक उपयोग करणे, बुध्दीवादी कार्यक्षेत्रातील माणसांना (चार्टर्ड अकाऊंटंट, वकील, टॅक्स कन्सल्टंट, उच्चपदस्थ अधिकारी इत्यादी) हा रुद्राक्ष अतिशय लाभदायक आहे.
चौदामुखी रुद्राक्षाला 'परमशिव' अशी संज्ञा आहे. शिवभक्तांसाठी हा रुद्राक्ष एकमुखी रुद्राक्षाइतकाच किंबहुना त्यापेक्षाही जास्त पवित्र आणि श्रध्देय आहे. चौदामुखी रुद्राक्ष हा नैसर्गिकरित्या शिवस्पंदनांनी युक्त असतो. चौदामुखी रुद्राक्ष धारणकर्त्याने रोज थोडावेळ ॐ नमः शिवाय या पंचाक्षरीचा जप केला तरी त्यास मनःशांतीचा अनुभव येतो. चौदामुखी रुद्राक्ष हा धारणकर्त्याचे पापकृत्यांपासून आणि अशुभ, दुष्ट विचारांच्या माणसांपासून रक्षण करतो. अनावश्यक वाटणारी भिती, अनामिक भय, भयगंड दूर व्हायला मदत होते. आत्मविश्वास आणि शारिरीक बळ यांची वृध्दी व्हायला हा रुद्राक्ष मदतगार ठरतो.
चौदामुखी रुद्राक्ष हा दक्षिणावर्ती शंखासारखाच लक्ष्मीकारक आणि धनकारक आहे. केलेल्या कष्टांना योग्य न्याय देणे, आर्थिक लाभ होणे, धनसंचय होणे, शेतीत उत्पन्नवृध्दी होणे किंवा जमीनीशी संबंधित व्यवसाय म्हणजे कन्स्ट्रक्शन, वीटभट्टी, शेती वगैरेत लाभ होतात.
चौदामुखी रुद्राक्ष धारण केल्याने धनसंचय आणि धनवृध्दी हे दोन्ही उद्देश साध्य होतात.



आपण ज्याला रुद्राक्ष देतोय त्याच्याकडे तो रुद्राक्ष पुढे किमान १०० वर्षे राहील असे आपण मानसिक गृहितक धरून रुद्राक्ष निवड करावी.

### रुद्राक्ष सिद्धता

रुद्राक्ष सिध्द करण्यासाठीच्या अनेक पध्दतींपैकी मी नेहमीच सगळ्यात जटील आणि थोडी एनर्जी कन्झ्युनिंग पद्धतच वापरतो. ही पद्धत थोड्याफार फरकाने मला अवलिया आणि एका नागाबाबाने शिकवली होती. चैतन्य ही संकल्पना वापरुन रुद्राक्षाचे नैसर्गिक गुणधर्म Enhance करण्याची ती जबरदस्त पध्दत आहे.

### रुद्राक्ष निवड

१) नोकरी करणारी मंडळी, क्लेरिकल जॉब,एच.आर. लॉजिस्टिक्स क्षेत्रात नोकरी करणारी मंडळी एकमुखी आणि दहामुखी रुद्राक्ष अतिशय लाभदायक ठरेल.
२) फायनान्स, इन्शुरन्स, आर्थिक देवाणघेवाण किंवा सर्व प्रकारच्या बँकिंग क्षेत्रात काम करणारी मंडळी, सरकारी नोकरी, उच्चपदस्थ अधिकारी, ॲडमिनिस्ट्रेशन क्षेत्रात कार्यरत असलेल्या मंडळींना एकमुखी, अकरामुखी आणि चौदामुखी रुद्राक्ष अतिशय लाभदायक ठरेल.
३) संगीत आणि नृत्य क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मंडळींना (परफॉर्मिंग आर्टस्) मी एक सुंदर कॉम्बिनेशन देतो ज्याला मी नाव दिले आहे. गंधर्व रुद्राक्ष यात मधोमध एक सुंदर नऊमुखी रुद्राक्ष आणि त्याच्या दोन्ही बाजूला दोन चारमुखी रुद्राक्ष असे धारण करावं. या कॉम्बिनेशनमुळे कलाकार मंडळींना एकाचवेळी कलाक्षेत्र आणि आर्थिक लाभ व्हायला मदत होते.
४) वैद्यकीय क्षेत्रात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष काम करणारी सर्व मंडळी म्हणजे डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, टेक्निशियन किंवा मानवी आरोग्याशी संबंधित क्षेत्रातील सर्व मंडळींनी एकमुखी आणि बारामुखी रुद्राक्ष धारण करावा.
५) विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील मंडळी एकमुखी, आठमुखी आणि अकरामुखी रुद्राक्ष अतिशय लाभदायक. वयाच्या आठव्या वर्षानंतर कोणीही विद्यार्थी मुलगा मुलगी आठमुखी रुद्राक्ष धारण करू शकतात.
६) ट्रॅव्हलिंग, ट्रान्स्पोर्ट, वाहतूक दळणवळण, प्रवासी, सर्व्हिस इंडस्ट्री, फिरते एजंट्स, सेल्स मार्केटिंग क्षेत्रातील मंडळी एकमुखी आणि नऊमुखी रुद्राक्ष अतिशय लाभदायक.
७) सर्व एकंदरीत व्यावसायिक, दुकानदार, इंडस्ट्रीएलिस्ट, उद्योजक, शेअर ट्रेडर्स, ब्रोकर्स, कमिशन एजंट्स एकमुखी, अकरामुखी, बारामुखी आणि चौदामुखी रुद्राक्ष अतिशय लाभदायक.
८) अभिनेते, अभिनेत्री, कलाक्षेत्रात काम करणारी, कला हेच उदरनिर्वाहाचं साधन असणारी मंडळी, क्रिएटिव्ह आर्टिस्ट, टेलरिंग किंवा कापडक्षेत्रात काम करणारे एकमुखी, बारामुखी रुद्राक्ष अतिशय लाभदायक.
९) फूड इंडस्ट्री, किराणामाल, हॉटेल व्यावसायिक, शेतकरी, यांना एकमुखी, चौदामुखी, तेरामुखी अतिशय लाभदायक.

एकमुखी रुद्राक्ष, दहामुखी रुद्राक्ष आणि अकरामुखी रुद्राक्ष हे इन जनरल लाभदायक ठरतातच. मद्यविक्री/दोन नंबर व्यावसायिकांनी रुद्राक्ष धारण न करता पत्रिकेनुसार सुयोग्य भाग्यरत्न धारण करावे. रुद्राक्ष धारणकर्त्यास मद्यप्राशन न करणे, परस्त्रीगमन व अनैतिक शारिरीक संबंध न ठेवणे आणि जुगार न खेळणे ही बंधने कटाक्षाने पाळावीच लागतात.

रुद्राक्ष हा पुरुष, स्त्री व तृतीयपंथी सर्वांनाच लाभदायक आहे. स्त्रीने मासिक पाळीच्या चार दिवसात रुद्राक्ष धारण करु नये हे उत्तम. केल्यासही हरकत नाही पण रुद्राक्षास अशौच नको ही भावना असावी.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**